## महिन्याचा विचार

### कर्मयोगातील परिपूर्णता

गुरूदेवांच्या सान्निध्यासाठी लोक का उत्सुक असत हे आता सहज समजेल. ते प्रत्यक्षात गुरूदेवांच्या चरणी लोळण घेत नसत. पण गुरूदेवांची सेवा, दयाळू, अंत:करण, दैवी प्रेम आधीच त्यांच्या अंत:करणापर्यंत पोहोचलेले असे. एकदा हे जुळून आले की मर्त्य शरीर आपोआपच मानवी जाणीवांसह, त्यांच्याशी नाते जोडण्यासाठी गुरूदेवांकडे धावत असे.

सुदूर राहणाऱ्या लोकानांही गुरूदेवांची ओढ कशी लागत असे आणि त्यांना दृष्टांत कसे होत हेही इथे समजून घेणे आवश्यक आहे. लोकांना गुरूदेवांची सेवा ही संकल्पना लोभस वाटत असे गुरूदेव त्यांना ती समजावून सांगण्यास उत्सुक असत. गुरूदेव सतत त्यांचाच विचार करीत असत. अर्थात त्यांचा मूळ स्वभावच अस मानण्याचा होता की साऱ्या देहांमध्ये एकाच विराट रूपात सामावण्याची शक्ती असते,सगळी मने एकाच हिरण्यगर्भाचे हिस्से असतात आणि हेच त्यांच्यासाठी मोक्षाचे स्वरूप होते हे विसरून चालणार नाही. म्हणून ते सूक्ष्मरूपाने युरोप, अमेरिका अशा देशांमध्ये सहजी फिरून येत आणि गरजवंतांना आपली सेवा देत.



भलेही अशा व्यक्तींना गुरूदेवांच्या मुखातून काहीही संदेश ऐकायला मिळाला नसेल अथवा गुरूदेवांची प्रवचने त्यांच्या कानी पडली नसतील, फक्त गुरूदेवांचे दर्शन झाले तरीही सर्वांना परमावधीचे समाधान लाभत असे. इतर साधुसंतांच्या प्रेरक व्याख्यानांपेक्षा गुरूदेव त्यांचे श्रध्दास्थान असे. सतत सेवाभाव आणि इतरेजनांचे दु:ख निवारण हेच गुरूदेवांचे ध्येय असे. हा भावच मानवतेच्या कल्याणासाठी प्रार्थना असे. गुरूदेव सर्वांच्या हदयात स्थानापन्न झालेले होते. आध्यात्मिकदृष्टया गुरूदेव समग्र मानवतेशी एकरूप घालेले होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून आनंद,मन:शांती,प्रकाश आणि प्रवाही जिवंतपण प्रक्षेपित होत असे.

त्यांच्या उपस्थितीत, सहवासात सगळ्यांना सकारात्मक कंपने जाणवत आणि प्रकाशातून शांततेची अनुभूती येत असे. अशा संताच्या सहवासात विनासायास आनंदाचा लाभ होतो. म्हणूनच गुरूदेव सगळ्यांचे प्रेम आणि आदर मिळण्यास पात्र झाले होते. गुरूदेवांनी कर्मयोगाचे हे दृश्य स्वरूप आपणांसमोर मांडलेले आहे आणि त्यासाठी त्यांनी स्वत:चे उदाहरण सर्वांसमोर ठेवलेले



आहे, त्यामुळे साधकांच्या आयुष्यात आमुलाग्र बदल घडून येताना दिसतो. त्यातून अहंभावाचे चूर्ण करणे, ''मी'' पणाचे विच्छेदन करणे संभवते. अंतत: मोक्ष शक्य होतो. (क्रमश:)

- Sivananda's Integral Yoga by Swami Venkatesananda

Pray to the Almighty Lord for help and guidance. Thirst for His grace. Place your trust in Him. Do not be moved by difficulties. Difficulties strengthen your will and augment your power of endurance and turn your mind towards God. He will guide you in all your activities.

**Swami Sivananda**

Just as you find out the defects of other persons, with the same critical mind, you should find out your own defects. Otherwise, the benefit of introspection and self-analysis will be lost.

**Swami Chidananda**

## The Flower of Flowers

Gurudev conveys that divine love or Prem is a flower of flower, rarest among flowers that is cultivated in devotee's heart. Prem or intense love for God is bhakti. This arises quite naturally in devotee's heart because he cannot live without God just as fish cannot live without water or sunflower without sunlight. Bhakti is of the nature of nectar.

Human birth, longing for liberation and protecting care of sage are indeed rare gifts of God. It is foolish not to exert for self-realisation despite being gifted with these rare endowments. It is verily committing (spiritual) suicide to cling to unreal things and not make right use of human birth..

Upanishad says that neither by progeny nor by wealth but by renunciation alone one can attain liberation. Egoism, mineness, anger, desires, craving etc. need to be renounced.

It is not very difficult to realise God in kaliyuga. Taking recourse to Lord's name is good enough for attaining realisation. In all ashram/places where satsang and svadhyaya happens, Satya Yuga, golden age resides. Kali yuga cannot enter here.

**Swami Sivananda**



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

* मे २०२२ महिन्याचा सत्संग दि. १५ रोजी संमिश्र पद्धतीने संपन्न झाला.
* ''दिव्य जीवन'' या आपल्या मासिक पत्रिकेचा अंक शाखेच्या सदस्यांना हार्ड आणि सॉफ्ट कॉपी स्वरूपात वितरित करण्यात आला.
* दरवर्षीप्रमाणे दि. १४ जुलै रोजी आपण ''शिवानंद स्मृती व्याख्यानाचे'' आयोजन करीत आहोत. वक्ते आहेत – कल्याण येथील मा. मंदार लेले. स्थळ गीता धर्म मंडळ, सदाशिव पेठ, पुणे
* दरवर्षीप्रमाणे आपली राज्यस्तरीय शालेय निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. लवकरच त्याचे निवेदन सहभागी शाळांना पाठविले जात आहे.

### पुणे शाखेचा पत्ता

श्री.नितीन देशपांडे<br>
'ईशावास्य' प्लॉट नं. ४९/सायंतारा, डी.एस.के. विश्व, धायरी, पुणे ४११०६८,<br>
मो.नं. ९८५०९३१४१७

बुक पोस्ट

प्रति





# दिव्य जीवन



वर्ष १७/अंक ६
जून २०२२

### निवेदन

आपल्या पुणे शाखेचे प्रथमाध्यक्ष श्री.भ.रा.नाईक यांचा प्रथम स्मृतीदिन दि. १९ जून रोजी आहे. या निमित्ताने माधवनगर(जि. सांगली) येथे सायंकाळी ५ वाजता त्यांनी अनुवादित केलेले(स्वामी शिवानंद लिखित) ''यशस्वी जीवन''(प्रकाशक–महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर) या पुस्तकाच्या अकराव्या आवृत्तीचे प्रकाशन मा.इंद्रजित देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. तसेच श्री. व सौ. नाईक यांच्या स्मृतिप्रित्यर्थ यंदापासून दिला जाणारा ''शिक्षणव्रती'' पुरस्कार कराड येथील सौ. माधुरी कुलकर्णी यांना मा. इंद्रजित देशमुख यांच्या हस्ते दिला जाणार आहे.